नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे | Year - 3rd
अंक - ३०५ | Issue - 305
वार शुक्रवार दि. २७ मार्च २०२६ | Blow- Friday Date 27 March 2026
ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com
वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com
पाने - ४ | Pages - 4
किंमत - ४.०० रुपये | Amount - 4 /- Rs
पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026
ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# खासगी ट्रॅव्हल-डंपरच्या अपघातात १३ जणांचा होरपळून मृत्यू

## भीषण धडकेने क्षणार्धातच बसने पेट घेतल्याने घडला अनर्थ



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

आंध्र प्रदेशातील मार्कापुरम जिल्ह्यात आज पहाटेच्या सुमारास एक हृदयद्रावक घटना घडली आहे. रायवरमजवळ एका खासगी ट्रॅव्हल्सची डंपरशी भीषण धडक होऊन झालेल्या अपघातात १३ प्रवाशांचा होरपळून मृत्यू झाला आहे. या भीषण अपघातात बस पूर्णपणे जळून खाक झाली असून, मृतांचा आकडा अधिकृतपणे १३ असल्याचे मुख्यमंत्री कार्यालयाने स्पष्ट केले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, 'हरिकृष्णा ट्रॅव्हल्स'ची ही बस तेलंगणातील निर्मल येथून आंध्र प्रदेशातील नेल्लोरकडे जात होती. आज (२६ मार्च) पहाटे सहाच्या सुमारास मार्कापुरम जिल्ह्यातील रायवरमजवळ बस आणि एका डंपरची समोरासमोर जोरदार धडक झाली. धडक इतकी भीषण होती की, क्षणार्धात बसने पेट घेतला. बसमधील प्रवाशांना बाहेर पडण्याची संधी मिळण्यापूर्वीच आगीने रौद्र रूप धारण केले. अपघाताची माहिती मिळताच स्थानिक प्रशासन आणि अग्निशमन दलाने घटनास्थळी धाव घेतली. सुमारे तीन तासांच्या शर्थीच्या प्रयत्नांनंतर आगीवर नियंत्रण मिळवण्यात आले.

### आंध्रप्रदेशातील मार्कापुरम जिल्ह्यातील रायवरम येथे घडली घटना

पोलिसांनी सुरुवातीला मृतांची संख्या १४ सांगितली होती, मात्र नंतर मुख्यमंत्री कार्यालयाने १३ जणांच्या मृत्यूला अधिकृत दुजोरा दिला आहे. बसमध्ये एकूण ३५ प्रवासी होते, त्यापैकी २२ जण जखमी झाले आहेत.

मार्कापुरमचे पोलीस अधीक्षक व्ही. हर्षवर्धन राजू यांनी सांगितले की, अपघातात जखमी झालेल्या २२ जणांना, ज्यात डंपर चालकाचाही समावेश आहे, तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. बसमध्ये ३५ प्रवासी प्रवास करत होते. घटनेचा पंचनामा सुरू असून मृतांची ओळख पटवण्याचे काम सुरू आहे.

**मुख्यमंत्र्यांकडून दुःख व्यक्त**

या भीषण अपघातावर आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री एन. चंद्रबाबू नायडू यांनी खोल दुःख व्यक्त केले आहे.

मृतांच्या नातेवाईकांप्रती त्यांनी संवेदना प्रकट केल्या असून, जखमींना योग्य उपचार देण्याचे आदेश प्रशासनाला दिले आहेत.

# राज्यात ३०-३१ मार्च दरम्यान वादळी पावसाची शक्यता

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : सध्या राज्यातील काही भागात अंशतः ढगाळ हवामान असून ही स्थिती या आठवड्यात कायम राहण्याची शक्यता आहे. राज्याच्या दक्षिण भागांमध्ये दुपारनंतर स्थानिक स्वरूपाचा वादळी पाऊस पडू शकतो. हा पाऊस प्रामुख्याने कर्नाटक व तेलंगणा सीमेलगत असलेल्या मराठवाडा, मध्य महाराष्ट्र व विदर्भातील सीमावर्ती भागांमध्ये राहण्याची



शक्यता आहे. दि. ३० मार्च दरम्यान राज्यातील काही भागांमध्ये प्रामुख्याने दुपारनंतर आभाळी हवामान तयार होऊन मेघगर्जनेसह पाऊस आणि वादळी वाऱ्यांची स्थिती निर्माण होण्याचा प्राथमिक अंदाज आहे. सध्याच्या अंदाजानुसार ही स्थिती प्रामुख्याने खानदेश, मराठवाडा, पश्चिम विदर्भ तसेच मध्य महाराष्ट्रातील भागांमध्ये दिसून येऊ शकते. उर्वरित विदर्भात देखील हवामानात बदल दिसू शकतो. या दरम्यान विजांचा कडकडाट, वादळी वारे, पाऊस आणि काही ठिकाणी गारपिटीची शक्यता नाकारता येत नाही. ३१ मार्च रोजीदेखील राज्याच्या काही भागांमध्ये या हवामानाचा परिणाम दिसू शकतो. शेतकऱ्यांनी पुढील काही दिवस हवामानाच्या अद्ययावत अंदाजांकडे लक्ष ठेवावे व त्यानुसार शेतीची कामे नियोजित करावीत. सध्या रब्बी पिकांची काढणी सुरू असल्याने शेतकऱ्यांनी काढणी केलेली पिके सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवावीत किंवा झाकून ठेवण्याची व्यवस्था करावी. तसेच वादळी वारे, पाऊस आणि संभाव्य गारपीटीपासून पिकांचे नुकसान टाळण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात येत आहे.

### शेतकऱ्यांनी काढणी केलेल्या पिकांना वादळी पाऊस आणि वाऱ्यापासून सुरक्षित ठेवावे

# भारतासह अन्य ६ देशांच्या जहाजांना होर्मुझ सामुद्रधुनी ओलांडण्याची इराणने दिली परवानगी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

तेहरान: मध्य पूर्वेत गेल्या चार महिन्यांपासून युद्ध सुरु आहे. इराण विरुद्ध इस्रायल, अमेरिका संघर्षामुळे अनेक देशांच्या अर्थव्यवस्था अडचणीत आल्या आहेत. इराणनं होर्मुझ सामुद्रधुनीतून होणारी खनिज तेलाची वाहतूक रोखल्यानं अनेक देशांसमोर ऊर्जा संकट निर्माण झालं आहे. पण इराणनं या संकटातून सहा देशांची सुटका केली आहे. यामध्ये भारताचा समावेश आहे.

होर्मुझ सामुद्रधुनीतून जगाच्या एकूण खनिज तेलाच्या वाहतुकीपैकी २० टक्के व्यापार चालतो. याच मार्गानं आखाती देशांचं खनिज तेल अनेक देशांपर्यंत जातं. इस्रायल, अमेरिकेनं इराणवर हल्ले सुरु करताच इराणनं होर्मुझच्या सामुद्रधुनीतून होणारी तेल वाहतूक रोखली आणि जगाच्या नाकीनऊ आणले. यानंतर आज इराणनं सहा देशांना संकटातून दिलासा दिला आहे. भारत , रशिया, चीन, इराक, पाकिस्तानच्या जहाजांना होर्मुझ सामुद्रधुनी ओलांडण्याची परवानगी इराणनं दिली आहे. या देशांची यादी आज सकाळीच इराणनं जाहीर केली. आता त्यात मलेशियाची भर पडली आहे. त्यामुळे इराणच्या मित्र देशांची संख्या सहावर पोहोचली आहे.



मलेशियाच्या जहाजांना होर्मुझ ओलांडण्याची परवानगी इराणकडून देण्यात आल्याची माहिती मलेशियाचे पंतप्रधान अन्वर इब्राहिम यांनी दिली आहे. 'आम्ही इराण, इजिप्त, तुर्की आणि आखातातील अन्य देशांच्या नेत्यांशी संवाद साधला. यानंतर इराणनं मलेशियन जहाजांना होर्मुझमधून प्रवास करण्यास हिरवा कंदिल दाखवला. याबद्दल मी इराणच्या अध्यक्षांचा आभारी आहे,' असं अन्वर यांनी देशाला संबोधित करताना म्हटलं.

आता आम्ही मलेशियन तेल टँकर्स आणि त्यावर असलेल्या कर्मचाऱ्यांच्या सुटकेची प्रक्रिया सुरु करत आहोत. कर्मचाऱ्यांचा परतीचा प्रवास सुरक्षित व्हावा यासाठी आमचे प्रयत्न सुरु आहेत. मध्य पूर्वेत शांतता नांदावी यासाठी प्रयत्नशील आहोत. यासाठी इराण आणि अन्य देशांशी संवाद साधला आहे,' असं अन्वर म्हणाले. मध्य पूर्वेत शांतता प्रस्थापित करणं सोपं नाही. कारण आपल्या सोबत अनेकदा विश्वासघात झाल्याचं इराणला वाटतं. इराणला सुरक्षेबाबत कोणतीही शाश्वती दिली जात नाही. त्यामुळे त्यांच्याकडून फारसा सकारात्मक प्रतिसाद मिळत नाही,' असं निरीक्षण त्यांनी नोंदवलं.

# कुवैत इंटरनॅशनल विमानतळावर ड्रोन हल्ला; इंधन टाकीला आग

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : आखाती देशाच्या उड्डाण मंत्रालयाने बुधवारी (२५ मार्च) दिलेल्या माहितीनुसार कुवेत इंटरनॅशनल विमानतळावर ड्रोनद्वारे हल्ला करण्यात आला. यावेळी इंधन टाकीला आग लागली. या घटनेत सुदैवाने कोणतीही जीवितहानी झालेली नाही.

प्राथमिक माहितीनुसार, नागरी उड्डाण महासंचालनालयाने ऑनलाइन जारी केलेल्या निवेदनात सांगितले की या हल्ल्यात फक्त मर्यादित नुकसान झाले आहे. प्रवक्ते अब्दुल्ला अल-राजही यांनी सांगितले की संबंधित अधिकाऱ्यांनी तात्काळ आपत्कालीन प्रक्रिया लागू केल्या आणि आग नियंत्रणात आणण्यासाठी अग्निशमन दलाला तैनात करण्यात आले. इराण अमेरिका इस्रायल यांच्यात युद्ध सुरु झाल्यापासून कुवैत विमानतळावर अनेक वेळा हल्ले झाले आहेत. १४ मार्च रोजी नागरी उड्डाण प्राधिकरणाने सांगितले होते की अनेक ड्रोनद्वारे करण्यात आलेल्या हल्ल्यात विमानतळाला लक्ष्य करण्यात आले आणि त्याच्या रडार प्रणालीवरही हल्ला झाला. त्या घटनेतही कोणतीही जीवितहानी झाली नव्हती.

यापूर्वी ८ मार्च रोजी ड्रोनने विमानतळावरील इंधन टाक्यांना लक्ष्य केले होते. तसेच त्याआधी प्रवासी टर्मिनलवर झालेल्या एका हल्ल्यात काही लोक किरकोळ जखमी झाले होते आणि काही प्रमाणात नुकसानही झाले होते.

## पेट्रोल असोसिएशनच्या सदस्यांची माहिती

# इराण देणार भारताला इंधन, तुटवड्याची भीती दूर, १०० जहाजे भारताच्या दिशेला रवाना

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : शहरात पेट्रोल पंपांवर वाढलेली गर्दी आणि काही पंप बंद असल्याने नागरिकांमध्ये निर्माण झालेल्या संभ्रमावर आता स्पष्टता आली आहे. पेट्रोल असोसिएशनच्या कोअर कमिटीचे सदस्य अली दारुवाला यांनी दिलेल्या माहितीनुसार, ही परिस्थिती तुटवड्यामुळे नसून तांत्रिक आणि आर्थिक कारणांमुळे निर्माण झाली आहे. अचानक क्रेडिट विड्रॉ केल्यामुळे अनेक पेट्रोल पंप चालकांना अडचणींचा सामना करावा लागला. पेट्रोलचा तुटवडा नसून, काही पंप मालकांकडे आगाऊ इंधन खरेदी करण्यासाठी आवश्यक पैसे नसल्यामुळेच पंप बंद ठेवावे लागले आहेत. जे पंप चालक ॲडव्हान्स पेमेंट करू शकले नाहीत, त्यांचेच पंप सध्या बंद आहेत, असं अली दारुवाला यांनी स्पष्ट केलं आहे.






पेट्रोलचा भाव एकही रुपया वाढणार नाही, असे स्पष्ट करत त्यांनी नागरिकांना दिलासा दिला. देशात इतका मोठा साठा उपलब्ध आहे की साठवण्यासाठी जागा कमी पडेल, असेही त्यांनी सांगितले. मात्र, लॉकडाऊनच्या भीतीमुळे नागरिक गरजेपेक्षा जास्त पेट्रोल साठवून ठेवत आहेत. एक-दोन लिटरऐवजी थेट १० लिटर पेट्रोल घेण्याची घाई सुरू असल्याने पंपांवर अनावश्यक गर्दी होत आहे. नागरिकांनी पंपांवर गर्दी करू नये आणि जास्तीचे पेट्रोल साठवू नये, असे आवाहन त्यांनी केले आहे. सध्या दिसणारी परिस्थिती ही केवळ अफवांमुळे निर्माण झालेली असून, प्रत्यक्षात इंधनाचा कोणताही तुटवडा नाही, असं अली दारुवाला यांनी स्पष्ट केलं.

दरम्यान, एक सकारात्मक आणि अतिशय चांगली गुडन्यूस समोर आली आहे. आज दुपारी साडेबारा वाजता इराणचे परराष्ट्र मंत्री आणि भारताचे परराष्ट्र मंत्री यांच्यात बैठक झाली. त्यानंतर इराणने भारतासह जगातील पाच देशांना इंधन वाहतुकीसाठी परवानगी दिली आहे. भारताकडे निघालेले सर्व टँकर्स पुढील ८ ते ९ दिवसांत सुरक्षितपणे पोहोचणार आहेत. भारताला पेट्रोल, डिझेल, एलपीजी, सीएनजी आणि एलएनजीचा पुरवठा करण्यासाठी जवळपास १०० जहाजे भारताच्या दिशेने रवाना झाली आहेत. पुढील ९ ते १० दिवसांत हा पुरवठा देशात पोहोचणार आहे, अशी माहिती अली दारुवाला यांनी दिली.

याशिवाय, सरकारला इंधनावर लिटरमागे सुमारे ५० रुपयांचा फटका बसत असल्याने सध्या डव्हान्स पेमेंट घेऊनच इंधन पुरवठा केला जात आहे. तसेच पीएनजी पाइपलाईनचे रखडलेले कामही उद्यापासून पूर्ण होणार आहे. एकूणच, भारतात इंधनाचा पुरेसा साठा उपलब्ध असून, पुढील १० ते १२ दिवसांत परिस्थिती पूर्णपणे सुरळीत होणार आहे. त्यामुळे नागरिकांनी घाबरून न जाता संयम ठेवावा, असे आवाहन अली दारुवाला यांनी केले.

# खाद्यतेलाच्या किंमतींमध्ये मोठी वाढ होणार; किचनचे बजेट कोलमडणार!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई: कच्च्या तेलाच्या वाढत्या किमतींमुळे अन्न प्रक्रिया कंपन्यांच्या अडचणी वाढल्या आहेत. त्यांचा उत्पादन खर्च वाढला आहे. सध्या कच्च्या तेलाच्या किमती कमी होण्याची कोणतीही चिन्हे दिसत नाहीत. काही काळासाठी, ब्रेंट क्रूडच्या किमती प्रति बॅरल १०० डॉलरच्या खाली घसरल्या होत्या. त्यानंतर, त्या १०० डॉलरच्या वर गेल्या.



अन्न प्रक्रिया कंपनीच्या अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे की, आतापर्यंत ते वाढलेला खर्च स्वतःच सहन करत आले आहेत, परंतु जर मध्य पूर्वेतील संकट दीर्घकाळ टिकले, तर त्यांना उत्पादनांच्या किमती वाढवण्यास भाग पडेल. कच्च्या तेलाच्या किमतीतील वाढीमुळे मालवाहतुकीचा खर्चही वाढला आहे.

एडब्ल्यूएल ग्री बिझनेसचे सीईओ श्रीकांत कान्हेरे म्हणाले की, पश्चिम आशियातील संकटामुळे वस्तूंच्या किमतीत मोठी वाढ झाली आहे. पॅकेजिंग साहित्याच्या किमतीत २०-२५ टक्क्यांनी वाढ झाली आहे. पुरवठा साखळीतील संभाव्य व्यत्ययांमुळे खाद्यतेल सीएनएफच्या किमतीही वाढल्या आहेत. सध्या फारसा परिणाम झालेला नाही. जर हे संकट एका महिन्यापेक्षा जास्त काळ टिकले, तर खाद्यतेलाच्या किरकोळ किमती वाढू शकतात. मार्चमध्ये भारतीय कच्च्या तेलाची बास्केट प्रति बॅरल १२३.१५ डॉलर होती. ही फेब्रुवारीमधील ६९.०१ डॉलरच्या पातळीपेक्षा लक्षणीयरीत्या जास्त आहे. पार्लेचे मयंक शाह म्हणाले की, कंपनी वाढलेल्या खर्चाचा काही भार ग्राहकांवर टाकण्याचा निर्णय घेऊ शकते. ते म्हणाले की, कच्च्या तेलाच्या किमतीतील वाढीमुळे उत्पादन, पॅकेजिंग आणि लॉजिस्टिक्स खर्चावर परिणाम झाला आहे. सिंपली फ्रेश आणि न्यूट्रिक ब्रँड्सची मालक असलेल्या बीएन ग्रुपने म्हटले आहे की, आम्ही आमच्या कामकाजावर परिणाम करणारा आर्थिक भार कमी करण्याचा प्रयत्न केला आहे. नफ्याचे प्रमाण वाढवण्याऐवजी ग्राहकांचा विश्वास संपादन करण्यावर आमचे लक्ष आहे.

अमेरिका-इस्रायल-इराण संघर्ष २८ फेब्रुवारी रोजी सुरू झाला. या संघर्षाला सुरुवात होऊन आता एक महिना झाला आहे. तेव्हापासून कच्च्या तेलाच्या किमती उच्च पातळीवर राहिल्या आहेत. संघर्षापूर्वी कच्च्या तेलाची किंमत प्रति बॅरल ७१-७२ डॉलर होती. बऱ्याच काळापासून किमती प्रति बॅरल १०० डॉलरच्या वर राहिल्या आहेत. याचा परिणाम लॉजिस्टिक्स आणि इतर सेवांवर झाला आहे.

## संपादकीय....

### तोबा गर्दी

शहरात पेट्रोल पंपांवर वाढलेली गर्दी आणि काही पंप बंद असल्याने नागरिकांमध्ये निर्माण झालेल्या संभ्रमावर आता स्पष्टता आली आहे. ही परिस्थिती तुटवड्यामुळे नसून तांत्रिक आणि आर्थिक कारणांमुळे निर्माण झाली आहे. अचानक क्रेडिट विड्रॉ केल्यामुळे अनेक पेट्रोल पंप चालकांना अडचणींचा सामना करावा लागला. पेट्रोलचा तुटवडा नसून, काही पंप मालकांकडे आगाऊ इंधन खरेदी करण्यासाठी आवश्यक पैसे नसल्यामुळेच पंप बंद ठेवावे लागले आहेत. जे पंप चालक ॲडव्हान्स पेमेंट करू शकले नाहीत, त्यांचेच पंप सध्या बंद आहेत, असे पेट्रोल असोसिएशनच्या कोअर कमिटीचे सदस्यांनी सांगितले. पेट्रोलचा भाव एकही रुपया वाढणार नाही, असे स्पष्ट करत त्यांनी नागरिकांना दिलासा दिला. देशात इतका मोठा साठा उपलब्ध आहे की साठवण्यासाठी जागा कमी पडेल. मात्र, लॉकडाऊनच्या भीतीमुळे नागरिक गरजेपेक्षा जास्त पेट्रोल साठवून ठेवत आहेत. एक-दोन लिटरऐवजी थेट १० लिटर पेट्रोल घेण्याची घाई सुरू असल्याने पंपांवर अनावश्यक गर्दी होत आहे. नागरिकांनी पंपांवर गर्दी करू नये आणि जास्तीचे पेट्रोल साठवू नये. सध्या दिसणारी परिस्थिती ही केवळ अफवांमुळे निर्माण झालेली असून, प्रत्यक्षात इंधनाचा कोणताही तुटवडा नाही. इराणचे परराष्ट्र मंत्री आणि भारताचे परराष्ट्र मंत्री यांच्यात बैठक झाली. त्यानंतर इराणने भारतासह जगातील पाच देशांना इंधन वाहतुकीसाठी परवानगी दिली आहे. भारताकडे निघालेले सर्व टँकर्स पुढील ८ ते ९ दिवसांत सुरक्षितपणे पोहोचणार आहेत. भारताला पेट्रोल, डिझेल, एलपीजी, सीएनजी आणि एलएनजीचा पुरवठा करण्यासाठी जवळपास १०० जहाजे भारताच्या दिशेने रवाना झाली आहेत. पुढील ९ ते १० दिवसांत हा पुरवठा देशात पोहोचणार आहे याशिवाय, सरकारला इंधनावर लिटरमागे सुमारे ५० रुपयांचा फटका बसत असल्याने सध्या डव्हान्स पेमेंट घेऊनच इंधन पुरवठा केला जात आहे. तसेच पीएनजी पाइपलाईनचे रखडलेले कामही उद्यापासून पूर्ण होणार आहे. एकूणच, भारतात इंधनाचा पुरेसा साठा उपलब्ध असून, पुढील १० ते १२ दिवसांत परिस्थिती पूर्णपणे सुरळीत होणार आहे. त्यामुळे नागरिकांनी घाबरून न जाता संयम ठेवावा, असे आवाहन केले आहे.

# सम्राट अशोक : तलवारीतून धम्माकडे- मानवतेच्या इतिहासातील अद्वितीय प्रवास

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भारतीय इतिहासात अनेक राजे झाले. काहींनी साम्राज्ये उभी केली, काहींनी युद्धे जिंकली, तर काहींनी संपत्ती आणि वैभवाची शिखरे गाठली. परंतु इतिहासात असे फार थोडे राजे आहेत ज्यांनी युद्ध जिंकूनही युद्धाचा त्याग केला आणि सत्ता असूनही मानवतेचा मार्ग स्वीकारला. अशाच अद्वितीय व्यक्तिमत्त्वाचे नाव म्हणजे अशोका, ज्यांना इतिहासात सम्राट अशोक महान म्हणून ओळखले जाते. सम्राट अशोक हे केवळ एक सामर्थ्यशाली राजा नव्हते, तर ते मानवतेचा संदेश देणारे, दयाभाव आणि करुणेचा मार्ग दाखवणारे एक अद्वितीय शासक होते. त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या जीवनाचा, त्यांच्या विचारांचा आणि त्यांच्या धम्मनीतीचा विचार करताना भारतीय समाजाला आजही नवी दिशा मिळू शकते.

अशोक हे बिंदुसार यांचे पुत्र आणि महान सम्राट चन्द्रगुप्त मौर्य यांचे नातू होते. मौर्य साम्राज्य आधीच विशाल होते, परंतु अशोक यांच्या काळात त्याने प्रचंड विस्तार केला. त्यांच्या सामर्थ्यवान लष्कराने भारतातील मोठा भूभाग जिंकला. त्यांच्या राजवटीच्या सुरुवातीला ते एक कठोर, निर्णायक आणि पराक्रमी योद्धा म्हणून ओळखले जात होते. सत्ता मजबूत करण्यासाठी त्यांनी अनेक युद्धे लढली. परंतु त्यांच्या आयुष्यातील सर्वात मोठा टप्पा ठरला तो कालिंग युद्ध कलिंग, इतिहास बदलणारा क्षण. कलिंग (आजचे ओडिशा) जिंकण्यासाठी झालेल्या युद्धाने इतिहासाची दिशा बदलली. या युद्धात लाखो लोक मारले गेले, हजारो जखमी झाले आणि असंख्य कुटुंबे उद्ध्वस्त झाली. रणांगणावर पडलेली प्रेते, विधवा झालेल्या स्त्रिया, अनाथ झालेली मुले या सगळ्या दृश्यांनी सम्राट अशोक यांचे मन हादरून गेले. इतिहासात सांगितले जाते की या युद्धानंतर त्यांनी रणांगणावर उभे राहून एक प्रश्न स्वतःला विचारला, या विजयाची किंमत इतकी भयानक का असावी? याच क्षणापासून त्यांच्या आयुष्यातील सर्वात मोठा परिवर्तनाचा प्रवास सुरू झाला.



कलिंग युद्धानंतर अशोक यांनी हिंसेचा मार्ग सोडला आणि बुद्धिस्म स्वीकारले. त्यांनी धम्म हा जीवनाचा आणि राज्यकारभाराचा आधार बनवला. धम्म म्हणजे केवळ धार्मिक विचार नव्हता. तर तो होता दया, करुणा, अहिंसा, सहिष्णुता, सर्व धर्मांचा आदर. सम्राट अशोक यांनी युद्ध जिंकणाऱ्या राजापासून मानवतेचा संदेश देणाऱ्या राजामध्ये केलेले रूपांतर हे जगाच्या इतिहासात अद्वितीय मानले जाते. अशोक यांनी आपल्या राज्यात धम्मनीती राबवली. त्यांनी प्रजेसाठी अनेक कल्याणकारी योजना सुरू केल्या. रस्त्यांच्या कडेला झाडे लावणे, प्रवाशांसाठी धर्मशाळा उभारणे, विहिरी बांधणे, रुग्णालये उभारणे या सगळ्या गोष्टी त्या काळात अत्यंत प्रगत विचारांचे उदाहरण होते. त्यांनी प्राण्यांच्या हत्येवर मर्यादा आणल्या आणि पर्यावरणाबद्दल संवेदनशीलता दाखवली. त्यांच्या शिलालेखांमध्ये प्रजेबद्दलची काळजी आणि नैतिकतेचा संदेश स्पष्टपणे दिसतो.



– प्रवीण बागडे, नागपूर
भ्रमणध्वनी: ९९२३६२०९१९
ई-मेल: pravinbagde@gmail.com

सम्राट अशोक यांनी बुद्धिसम चा संदेश केवळ भारतापुरता मर्यादित ठेवला नाही. तर त्यांनी धम्म दूत विविध देशांत पाठवले. श्रीलंका, म्यानमार, थायलंड, नेपाळ, अफगाणिस्तान अशा अनेक देशांमध्ये बौद्ध विचारांचा प्रसार झाला. इतिहासात सांगितले जाते की त्यांचा पुत्र महिंदा आणि कन्या संघमित्ता यांनी श्रीलंकेत बौद्ध धर्माचा प्रसार केला. यामुळे भारताची सांस्कृतिक ओळख जगभर पोहोचली. अशोक यांनी आपल्या प्रशासनात नैतिकतेला विशेष महत्त्व दिले. त्यांनी धम्ममहामात्र नावाचे अधिकारी नेमले जे लोकांच्या कल्याणाची काळजी घेत होते. राज्यकारभाराचा उद्देश केवळ सत्ता टिकवणे नसून प्रजेचे सुख आणि कल्याण आहे, हा विचार त्यांनी प्रत्यक्षात आणला. आजच्या लोकशाही व्यवस्थेतही हा विचार अत्यंत महत्त्वाचा आहे.

ाज भारताने विज्ञान, तंत्रज्ञान आणि अर्थकारणात मोठी प्रगती केली आहे. परंतु सामाजिक तणाव, हिंसा, असहिष्णुता आणि द्वेषाची भावना अनेक ठिकाणी दिसून येते. अशा वेळी सम्राट अशोक यांची धम्म नीती आपल्याला आठवण करून देते की, सत्ता मोठी असते, पण मानवता त्याहून मोठी असते. त्यांच्या जीवनातून आपल्याला एक महत्त्वाचा संदेश मिळतो.

खरा विजय तलवारीने नाही, तर करुणेने मिळतो. आज भारताच्या राष्ट्रीय प्रतीकांमध्येही अशोक यांची छाप दिसते. भारतीय राष्ट्रचिन्हातील लॉयन कैपिटल ऑफ अशोका हे त्यांच्याच काळातील सारनाथ स्तंभाचे शिल्प आहे. तसेच भारतीय ध्वजावरील अशोक चक्र हे त्यांच्या धम्म चक्राचे प्रतीक आहे. याचा अर्थ असा की आधुनिक भारताच्या मूल्यांमध्येही सम्राट अशोक यांच्या विचारांची छाया आहे. आज जगभरात युद्धे, संघर्ष आणि राजकीय तणाव वाढताना दिसत आहेत. अशा काळात सम्राट अशोक यांचा इतिहास आपल्याला एक महत्त्वाचा धडा देतो. हिंसेने सत्ता मिळू शकते, पण मन जिंकता येत नाही. मानवतेचा मार्ग स्वीकारणारा राजा खऱ्या अर्थाने महान ठरतो.

सम्राट अशोका यांचे जीवन म्हणजे शक्तीपासून शांतीकडे, युद्धापासून करुणेकडे आणि अहंकारापासून मानवतेकडे जाणाऱ्या प्रवासाची प्रेरणादायी कथा आहे. त्यांनी दाखवलेला धम्माचा मार्ग आजही मानवतेसाठी प्रकाशाचा दीप आहे. आज त्यांच्या जयंतीनिमित्त आपण केवळ त्यांच्या साम्राज्याचे स्मरण करू नये, तर त्यांच्या विचारांचे स्मरण करावे. कारण खऱ्या अर्थाने महान राजा तोच असतो, जो तलवारीने नव्हे, तर मानवतेने जग जिंकतो. सम्राट अशोक यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या महान विचारांना विनम्र अभिवादन!

# जनतेच्या विश्वासाचा आधारवड कोसळला : दत्ता मेघे युगाचा अंत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

विदर्भाच्या राजकीय, शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात अढळ ठसा उमटवणारे ज्येष्ठ नेते दत्ता मेघे यांच्या निधनाची बातमी ही केवळ एका व्यक्तीच्या जाण्याची घटना नाही; ती एका युगाच्या अस्ताची वेदनादायी जाणीव करून देणारी आहे. सार्वजनिक जीवनात सातत्याने सक्रिय राहून लोकसभा, राज्यसभा आणि विधान परिषद अशा विविध सभागृहांतून जनतेचा आवाज बुलंद करणाऱ्या या दिग्गज व्यक्तिमत्त्वाच्या जाण्याने विदर्भासह संपूर्ण महाराष्ट्राने एक अनुभवी, दूरदृष्टीचा आणि समाजाशी नाळ जपणारा नेता गमावला आहे. दत्ता मेघे यांचे व्यक्तिमत्त्व बहुआयामी होते. संसदीय व्यासपीठावर त्यांनी केवळ प्रश्न उपस्थित केले नाहीत, तर त्या प्रश्नांच्या मुळाशी जाऊन शासनव्यवस्थेला दिशा देण्याचे काम केले. त्यांच्या राजकीय प्रवासाकडे पाहिले, तर तो सत्तेच्या मोहाचा नव्हे, तर समाजकारणाशी नाळ जोडणाऱ्या आणि विकासाला केंद्रस्थानी ठेवणाऱ्या नेतृत्वाचा प्रवास होता.



– प्रवीण बागडे, नागपूर
भ्रमणध्वनी: ९९२३६२०९१९
ई-मेल: pravinbagde@gmail.com

विकासाच्या असमतोलाने दीर्घकाळ त्रस्त असलेल्या विदर्भासाठी दत्ता मेघे हे केवळ राजकारणी नव्हते, तर ते एक ठाम आवाज होते. शेतीचे प्रश्न, उद्योगधंद्यांची कमतरता, बेरोजगारी आणि पायाभूत सुविधांची उणीव, या सगळ्या समस्यांकडे त्यांनी केवळ आकडेवारी म्हणून पाहिले नाही, तर त्या मागील मानवी वेदना समजून घेतल्या. म्हणूनच त्यांच्या भूमिकेत केवळ राजकीय आक्रमकता नव्हती, तर सामाजिक संवेदनशीलताही होती.

राजकारणात त्यांनी सत्तेच्या गणितांपेक्षा विकासाच्या समीकरणांना प्राधान्य दिले. पक्षीय समीकरणांच्या गुंतागुंतीतही त्यांनी आपली स्वतंत्र ओळख जपली. त्यांची शैली आक्रमक असली, तरी ती केवळ विरोधासाठी नव्हती; ती रचनात्मक टीका आणि पर्यायी विचार मांडण्यासाठी होती. शासनाच्या धोरणांवर टीका करताना त्यांनी ठोस उपायही सुचवले, हे त्यांच्या नेतृत्वाचे वैशिष्ट्य ठरते. दत्ता मेघे यांच्या कार्याचा सर्वात भक्कम पाया म्हणजे शिक्षण क्षेत्रातील त्यांचे योगदान. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे, त्यांच्या स्वप्नांना दिशा मिळावी आणि ते आत्मनिर्भर बनावेत, यासाठी त्यांनी उभारलेल्या शैक्षणिक संस्थांनी हजारो कुटुंबांचे आयुष्य बदलले. शिक्षण हे केवळ रोजगाराचे साधन नसून समाजपरिवर्तनाचे प्रभावी माध्यम आहे, या विश्वासातून त्यांनी उभे केलेले कार्य आजही प्रेरणादायी आहे.

आज शिक्षणाचे वाढते व्यापारीकरण चिंताजनक ठरत असताना, दत्ता मेघे यांनी शिक्षणाला सामाजिक बांधिलकीची जोड दिली. त्यांच्या संस्थांमधून घडणारे विद्यार्थी केवळ पदवीधर नाहीत, तर ते समाजाभिमुख नागरिक असतात, हीच त्यांच्या कार्याची खरी पावती आहे. सामाजिक क्षेत्रातही त्यांचे योगदान तितकेच मोलाचे होते. वंचित आणि दुर्बल घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. समाजातील विषमता कमी व्हावी, संधींचे समान वितरण व्हावे, यासाठी त्यांनी कृतीशील भूमिका घेतली. त्यांच्या कार्यात घोषणाबाजीपेक्षा कृतीला अधिक महत्त्व होते आणि हीच बाब त्यांना इतरांपेक्षा वेगळे ठरवते.

आजच्या राजकारणात तात्कालिक फायद्यासाठी भूमिका बदलणारे, समाजाशी तुटलेले आणि केवळ सत्तेसाठी धडपडणारे नेतृत्व वाढताना दिसते. अशा काळात दत्ता मेघे यांसारख्या मूल्यनिष्ठ नेत्यांची उणीव अधिक प्रकर्षाने जाणवते. त्यांनी आपल्या राजकीय आयुष्यातील चढ-उतार स्वीकारले, पराभव पचवले; पण जनतेशी असलेली नाळ कधीही तुटू दिली नाही. हेच त्यांच्या नेतृत्वाचे खरे बळ होते. त्यांच्या निधनाने एक मूलभूत प्रश्न समोर येतो की, आजच्या राजकारणात अशा प्रकारचे नेतृत्व घडवले जात आहे का? समाजाशी जोडलेले, विकासाला प्राधान्य देणारे आणि दीर्घकालीन दृष्टी असलेले नेते निर्माण होणे ही काळाची गरज आहे. निवडणुका जिंकणे हेच नेतृत्वाचे अंतिम मापदंड नसून, समाजावर सकारात्मक आणि दीर्घकालीन परिणाम घडवणे हेच खरे नेतृत्व आहे, हे दत्ता मेघे यांच्या कार्यातून अधोरेखित होते.

त्यांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी सहज भरून निघणारी नाही. मात्र, त्यांच्या कार्याचा वारसा पुढे नेणे हीच खरी जबाबदारी आहे. त्यांच्या विचारांना, कार्यपद्धतीला आणि सामाजिक बांधिलकीला अनुसरून काम केले, तरच त्यांच्या स्मृतीला खरी आदरांजली ठरेल. आज अनेकजण त्यांना शब्दांत श्रद्धांजली अर्पण करत आहेत; परंतु खरी श्रद्धांजली ही कृतीतूनच व्यक्त होते. समाजासाठी काम करण्याची जिद्द, शिक्षणाला दिलेले प्राधान्य आणि विकासासाठी घेतलेली ठाम भूमिका, या मूल्यांचा स्वीकार केला, तरच त्यांच्या कार्याला खरी सलामी दिली जाईल. दत्ता मेघे यांचे आयुष्य हे संघर्ष, समर्पण आणि समाजसेवेचा जिवंत आदर्श आहे. त्यांनी ज्या मूल्यांसाठी आयुष्य झोकून दिले, ती मूल्ये आजही तितकीच महत्त्वाची आहेत. व्यक्ती निघून जातात, पण त्यांचे विचार आणि कार्य अमर राहतात, दत्ता मेघे हे त्यापैकीच एक. त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

भावपूर्ण श्रद्धांजली.

## बुद्धाच्या श्रावस्तीतील थाई मॉनेस्ट्रीत वैचारिक प्रबोधनात्मक कार्यशाळा संपन्न




# भारताचे संविधान हा एक वैध तरतुदींचा दस्तावेज आहे : बी. बी. मेश्राम

श्रावस्ती/प्रतिनिधी : दि ऑल इंडिया नाग संघाच्या द्वितीय वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशन संचलित लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी आवश्यक कार्य प्रणालीच्या पूर्वावर्ती शर्थी. या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विधानाच्या ७४ व्या वर्धापन दिनानिमित्त सदरील ऐतिहासिक, प्रासंगिक विषयावर १६२ वी शतकोत्तर मोफत वैचारीक प्रबोधनात्मक कार्यशाळा बुद्धाच्या श्रावस्तीतील थाई मॉनेस्ट्रीत १७ मार्च २०२६ ला संपन्न झाली.

फुले, शाहू, आंबेडकराईट स्टडी फाउंडेशनचे संचालक व अखिल भारतीय नाग संघाचे राष्ट्रीय संघटक बी. बी. मेश्राम अध्यक्षीय मार्गदर्शन करताना म्हणाले की, संसदीय लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी तत्त्वज्ञ वॉल्टर बेग हॉट च्या म्हणण्यानुसार चर्चेतून मार्ग काढत राहिले पाहिजे. करिता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी २२ डिसेंबर १९५२ ला पुण्याच्या लॉ लायब्ररीमध्ये संदेश देताना स्पष्ट केले होते की, समाजात विषमता असता कामा नये ज्यात रक्तरंजित क्रांतीचे बीजे असतात. विरोधी पक्षाचे अस्तित्व प्रबळ असावे. कायद्यासमोर सर्व समान असतात म्हणून कायदा व प्रशासन मजबूत असावे. भारताचे संविधान हा एक वैध तरतुदीचा दस्तावेज आहे. नैतिकतेला सर्वोच्च स्थान दिले जावे. लोकनिष्ठा प्राथमिकतेवर असावी ज्याला कर्तव्यनिष्ठेची जोड असावी. परिणामी बहुसंख्यांक लोक अल्पसंख्यांकावर अन्याय करणार नाहीत. या सर्व अटी व शर्थींची अंमलबजावणी करण्यासाठी प्रशिक्षित जनता व नेत्यांची आवश्यकता आहे. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ट्रेनिंग स्कूल फॉर एंट्रन्स टु पॉलिटिक्स चालविले पाहिजे असे म्हटले होते. त्याची सुरुवात एक जुलै १९५६ ला करण्यात आली होती. मात्र ते मार्च १९५७ च्या पुढे चालू शकले नाही. अन्यथा आज समाजाचे चित्र वेगळे असते. म्हणून आपण ट्रेनिंग स्कूल फॉर एंट्रन्स टू मुव्हमेंट चालविले पाहिजे. त्याचाच एक भाग म्हणून आम्ही सातत्याने कार्यशाळांचे आयोजन करत आहोत. ज्यात सर्वांना व्यक्त होण्याची संधी दिली जात असून ऐकणाऱ्यांमध्ये बोलण्याची क्षमता विकसित व्हावी म्हणून आम्ही प्रयत्नशील आहोत, आपणही प्रयत्न करावे. करिता प्रात्यक्षिक करून दाखविण्यासाठी या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

उद्घाटनपर मार्गदर्शन करताना अखिल भारतीय नाग संघाचे राष्ट्रीय परिषद सदस्य संजीव कुमार म्हणाले की, व्यक्ती म्हणून समाज जीवनात आपण लोकतांत्रिक नसल्यामुळे अनेक प्रकारच्या समस्या निर्माण झालेल्या आहेत. सदरील समस्यावर तोडगा काढण्यासाठी लोकतांत्रिक प्रक्रियेनुसार चर्चा करून योग्य निर्णय घेतले पाहिजेत जेणेकरून त्यावर अंमलबजावणी केल्यास समस्या निर्मूलन होऊ शकतील. करिता प्रबोधनात्मक कार्यशाळेची कार्यप्रणाली समजून घेऊन अंमलबजावणी केली पाहिजे.

प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन करताना अखिल भारतीय नाग संघाचे व्हॉइस चेअरमन जे. एन. राम म्हणाले की, उपस्थित सर्व प्रतिनिधींना आपले मत व्यक्त करण्याची संधी उपलब्ध करून देणे ही या कार्यशाळेची विशेषता आहे. जनतेला नैतिक शिक्षण देऊन वैचारिक परिपक्वता प्राप्त करणे आवश्यक आहे. लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी सर्व नागरिक जागरूक आणि शिक्षित असणे आवश्यक आहे. करिता स्वतंत्र आणि निष्पक्ष निवडणुका होण्याची आवश्यकता आहे.

याप्रसंगी चेअरमन डॉ. राजीव कुमार म्हणाले की, अशा प्रकारच्या प्रबोधनात्मक कार्यशाळेतून प्रशिक्षित कॅडर व लीडर निर्माण होण्याची शक्यता आहे. कार्यशाळेची प्रक्रिया हा एक योग्य मार्ग आहे. सामाजिक लोकशाहीतून आर्थिक व राजकीय लोकशाही प्रबळ होईल. दिल्ली राज्याध्यक्ष मुन्नी देवी म्हणाल्या की, कुटुंबात ऐक्य निर्माण केल्याने घरापासून लोकशाहीची सुरुवात होईल. भारतीय भीम सेनेच्या उपाध्यक्ष चित्रा गायकवाड म्हणाल्या की, या प्रशिक्षणात अनेक बाबी समजून घेता आल्या म्हणून महिलांनी जास्त प्रमाणात सहभागी होण्याची आवश्यकता आहे. पत्रकार साक्षी गौतम म्हणाल्या की, आपला संदेश सामान्य जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी आपल्या पत्रकारितेची लेखनी झिजविली पाहिजे. गुजरातचे प्रतिनिधी भानजीभाई राठोड म्हणाले की, लोकशाहीच्या सुदृढीकरणासाठी लोकतांत्रिक जनमत विकसित केले पाहिजे. ज्योत्स्ना राव म्हणाल्या की, आपण एकजुटीने राहायला पाहिजे. प्रा. विलास कटारे म्हणाले की, आपल्या आचरनातूनच आपली ओळख निर्माण झाली पाहिजे. उद्योजक मिलिंद बागुल म्हणाले की, प्रश्न विचारणाऱ्यांनी उत्तरे ऐकण्यासाठी सभागृहात उपस्थित राहिले पाहिजे. प्रा. शिवम गायकवाड म्हणाले की, लोकशाहीचे महत्त्व नीट समजून घेऊन त्याचे संचालन केले पाहिजे. रामप्रवेश बैठा म्हणाले की, बुद्ध शासनात जनतेबरोबर आपल्या अपत्याप्रमाणे व्यवहार केला पाहिजे. अर्जुन राम म्हणाले की, परिवर्तनासाठी कार्यशाळेची प्रक्रिया आवश्यक आहे. हरदेव बैठा म्हणाले की, आम्ही नागवंशी लोक आहोत. सोहनलाल म्हणाले की, अष्टांगीक मार्गाचा अवलंब केला पाहिजे.

याप्रसंगी विविध राज्यातील शेकडो प्रतिनिधी उपस्थित होते. सूत्रसंचालन व प्रास्ताविक ॲड. विलास रामटेके यांनी व्यक्त केले. अशाप्रकारे हर्षोल्हासात वैचारिक प्रबोधनात्मक कार्यशाळा संपन्न झाली.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरात रामजन्मोत्सव उत्साहात साजरा; भाविकांची दर्शनासाठी गर्दी

## श्रींच्या अंगावर गुलाल टाकून राम जन्मोत्सव सोहळा पार पडला : कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके


**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : आज रामनवमी प्रतिवर्षीप्रमाणे श्री विठ्ठल सभामंडपामध्ये श्री रामनवमी जन्मोत्सव सकाळी १०.०० ते १२.०० या वेळेत मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. श्री विठ्ठलास सकाळी ११.०० महानैवेद्य नंतर पांढरा पोशाख, पागोटे व साखरेचा हार परिधान करून श्रींच्या अंगावर गुलाल टाकून दुपारी १२.०० वाजता राम जन्मोत्सव सोहळा पार पडल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

श्री विठ्ठल सभा मंडपामध्ये श्रीराम जन्माचे श्री. विठ्ठल महाराज देहूकर फड (बिद्रीकर मंडळी) ह.भ.प.श्री. श्रीकांत महाराज पातकर, पंढरपूर यांचे श्री. रामनवमी जन्मोत्सवाचे कीर्तन संपन्न झाले किर्तन झाल्यानंतर उपस्थित भाविकांना प्रसाद म्हणून सुंठवडा वाटप करण्यात आला. यावेळी मंदिर समितीच्या सन्माननीय सदस्या श्रीमती शकुंतला नडगिरे, सदस्य श्री संभाजी शिंदे, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, प्र. व्यवस्थापक संदेश भोसले, लेखा अधिकारी मुकेश अनेचा, विभाग प्रमुख संजय कोकीळ, सहाय्यक विभाग प्रमुख संदीप कुलकर्णी प्रसाद दशपुत्रे व कर्मचारी वृंद उपस्थित होते.



याशिवाय, रामनवमी जन्मोत्सवा निमित्त श्री संत तुकाराम भवन येथील



अन्नछत्राच्याभोजनप्रसादामध्ये गोड पदार्थाचा समावेश करण्यात आला होता, सुमारे २००० भाविकांनी प्रसादाचा लाभ घेतल्याचे प्र. व्यवस्थापक संदेश भोसले यांनी यावेळी सांगितले.

# अफवांवर विश्वास ठेवू नका; इंधन पुरवठा सुरळीत, तहसीलदार नाईकवाडे यांचे आवाहन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : तालुक्यातील नागरिकांनी पेट्रोल-डिझेलच्या तुटवड्याबाबत पसरत असलेल्या अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन तहसीलदार विशाल नाईकवाडे यांनी केले आहे. सध्या इंधनाचा पुरवठा सुरळीत असून कोणत्याही प्रकारची कमतरता नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

अनेकदा सोशल मीडियावर येणाऱ्या अप्रमाणित संदेशांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होते. परिणामी, पेट्रोल पंपांवर अचानक मोठ्या प्रमाणात गर्दी होते व विनाकारण रांगा लागतात. या परिस्थितीमुळे खरोखर गरज असलेल्या नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागतो. त्यामुळे अफवांपासून दूर राहून संयम राखण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

तहसीलदार नाईकवाडे यांनी सांगितले की, इंधनाचा साठा पुरेसा असून पुरवठा साखळीत कोणताही अडथळा नाही.



जिल्हा प्रशासन तसेच तेल कंपन्या परिस्थितीवर सतत लक्ष ठेवून आहेत. नागरिकांनी सोशल मीडियावर येणाऱ्या संदेशांची खातरजमा केल्याशिवाय त्यावर विश्वास ठेवू नये, असेही त्यांनी नमूद केले.

तसेच विनाकारण साठा करण्याच्या उद्देशाने पेट्रोल पंपांवर गर्दी टाळावी. अशा गर्दीमुळे वाहतूक कोंडी निर्माण होऊन सर्वसामान्य नागरिकांना त्रास होण्याची शक्यता असते. तालुक्यातील नागरिकांनी शांतता राखत प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन तहसीलदार विशाल नाईकवाडे यांनी केले आहे.

# पंढरपुरात आरटीओ ऑफिस करण्याची मागणी आ. अभिजीत पाटील यांनी विधानसभेत केली

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर शहरांमध्ये सुशिक्षित बेकारांना काम मिळत नसल्यामुळे पंढरपूर मध्ये अनेक तरुण रिक्षा चालवण्याचा व्यवसाय करीत आहेत. रिक्षा पासिंग व आरटीओ ची इतर कामे करण्यासाठी सोलापूरला जावे लागते. रिक्षा चालकांना वेळ व पैसा वाया घालवावा लागत असल्याने. पंढरपूर शहरामध्ये आरटीओ ऑफिस करावे अशी मागणी आमदार अभिजीत पाटील यांनी विधानसभेत केली.

पंढरपूर हे राज्यातील महत्त्वाचे तीर्थक्षेत असल्यामुळे विठ्ठलाच्या दर्शनासाठी दररोज ६० ते ७० हजार




लोक पंढरपूर मध्ये भाविक येत असतात. व पंढरपुरातील विविध मठ व मंदिरे यांना भाविक भेट देतात व पंढरपूर मध्ये फिरण्यासाठी त्यांना रिक्षाची गरज भासत असते. त्यामुळे रिक्षाचा व्यवसाय चांगला चालत असल्यामुळे. अनेक सुशिक्षित बेरोजगार तरुणांनी रिक्षा व्यवसाय चालू केला आहे. मात्र रिक्षाची पासिंग व इतर आरटीओ कामे करण्यासाठी सोलापूरला जावे लागत असल्याने वेळ व पैसा वाया जात असल्यामुळे पंढरपूर शहरांमध्ये आरटीओ मागणी अनेक वर्षापासून होत आहे . मात्र याकडे शासनाची दुर्लक्ष होत असल्यामुळे. त्यामुळे आमदार अभिजीत पाटील यांनी विधानसभेत आवाज उठवला आहे पंढरपूर मध्ये अनेक शासकीय कार्यालय आहेत. त्यामुळे पंढरपूर शहरांमध्ये आरटीओ ऑफिस नसल्यामुळे येथील शहरातील लोकांची गैरसोय होत आहे. आरटीओ कार्यालय पंढरपूर मध्ये सुरू करावी अशी मागणी आमदार अभिजीत पाटील यांनी विधानसभेत केली आहे.

# कविता निर्मळे हिला उत्कृष्ट कामगिरीबद्दल पोलीस अधीक्षक संदीप घुगे यांच्या हस्ते सन्मान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

टाकळीवाडी/प्रतिनिधी : टाकळीवाडी तालुका शिरोळ येथील कविता पुंडलिक निर्मळे तिची नेमणूक विश्रामबाग पोलीस ठाणे येथे कार्यरत आहे.





कोर्ट पेरवी अंमलदार म्हणून उत्कृष्ट कामगिरीबद्दल हिला सांगली पोलीस अधीक्षक संदीप घुगे यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आला. हिचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# निफाड पोलीसांतर्फे मृतदेह शोधण्यात मदत करणाऱ्या पाच युवकांचा सन्मान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड पोलीस ठाणे मध्ये दाखल असलेल्या खुण्याच्या मर्डर केसमधील मयताचे प्रेत विहिरीतून काढण्यासाठी मदत करणारे आपत्ती व्यवस्थापन मधील युवक बापू भाऊसाहेब जेऊघाले, अंकुश लक्ष्मण भोसले, संदीप राजाराम जाधव, सनी गीताराम पवार या युवकांनी मयताचे प्रेत विहिरीतून काढण्यात पोलिसांना मदत केली, म्हणून निफाड पोलीस स्टेशन यांच्यावतीने त्यांचा आज सन्मानपत्र ट्रॉफी व शाल देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी पोलीस निरीक्षक गणेश गुरव, सहाय्यक पोलीस निरीक्षक सोनल फडोळ, पोलीस नाईक नितीन सांगळे, पोलीस हवालदार नितीन साळवे, पोलीस हवालदार कपालेश्वर ढिकले, महिला पोलीस नाईक मनीषा गायकवाड, पोलीस कॉन्स्टेबल अरविंद ढवळे, धनंजय जाधव, राजेंद्र दरोडे ,धनंजय बैरागी, विक्रम लहाने, विनोद जाधव, योगेश आव्हाड आदी पोलीस कर्मचारी, पदाधिकारी उपस्थित होते



## रोजगार निर्मिती तसेच विविध प्रशासकीय बाबींवर चर्चा करण्यासाठी बेरोजगार सेवा संस्था व फेडरेशन च्या शिष्टमंडळाने दिले निवेदन

# मुंबईतील बेरोजगार सेवा सहकारी संस्थांच्या शिष्टमंडळाने घेतली महापौर रितू तावडे यांची भेट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई/केतन भोज : मुंबईतील बेरोजगार सेवा सहकारी संस्थांच्या अडचणींबाबत, मुंबई शहर बेरोजगार सेवा सहकारी संस्था फेडरेशन मर्यादित यांच्या शिष्टमंडळाने बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालयातील महापौर दालनात मंगळवार (ता.२४) रोजी महापौर रितू तावडे यांची भेट घेतली. सोबत उपमहापौर संजय घाडी यांची देखील या शिष्टमंडळाने भेट घेतली.

यावेळी महापौर रितू तावडे यांच्या शुभेच्छा भेटीच्या वेळी बेरोजगार सेवा संस्थाच्या मागण्याचे निवेदन त्यांना देण्यात आले.बेरोजगार सेवा सहकारी संस्था आणि महिला सहकारी संस्थाच्या अडचणी व प्रश्न यावेळी महापौर रितू तावडे यांच्याकडे मांडत असताना महापौर रितू तावडे यांनी उपायुक्त (घनकचरा व्यवस्थापन)किरण दिघावकर यांना या बैठकीला बोलावून बेरोजगार सेवा व सेवा सहकारी संस्थाचे प्रश्न



समजून घेऊन उपायुक्त यांना यावर मार्ग काढण्याच्या सूचना दिल्या. या महापौर शुभेच्छा भेटी मध्ये सर्व बेरोजगार सेवा सहकारी संस्थेच्या व फेडरेशन च्या पदाधिकारी समवेत ही बैठक पार पडली. या बैठकीत बेरोजगार सेवा सहकारी संस्था व फेडरेशनचे पदाधिकारी यांच्याकडून खालील विषय महापौर रितू तावडे व उपायुक्त (घनकचरा व्यवस्थापन) यांच्या समोर मांडण्यात आले.

१) मुंबई शहर बेरोजगार सेवा सहकारी संस्था फेडरेशनने उच्च न्यायालयात दाखल केलेल्या रिट याचिका १४३९/२०२४ च्या अनुषंगाने नगर विकास विभाग आणि महानगरपालिका अधिकारी यांच्यात झालेल्या बैठकीत शासनाच्या GR नुसार बेरोजगार सेवा संस्थांना कोणकोणती कामे देणार याबाबत विचारणा करण्यात आली.

२) घनकचरा व्यवस्थापन विभागातील दत्तक वस्ती योजना मध्ये बदल होण्याची शक्यता आहे त्या विषयावर चर्चा झाली.त्याचप्रमाणे मोटर लोडिंग कामासाठी सहा



कंपन्यांची नियुक्ती झालेली आहे. त्या कामांमध्ये एनजीओ पुरवण्याचे काम सदर बेरोजगार सेवा संस्था, महिला सहकारी संस्थांना देण्यात यावे व घनकचरा व्यवस्थापन विभागांमध्ये निघणाऱ्या निविदांमध्ये सर्व वॉर्ड मध्ये सुसूत्रता असावी अशी मागणी करण्यात आली.

३) मुंबई बँक व मिटकॉन यांनी संस्थांना मुंबई महानगरपालिकेच्या वतीने गाळे व स्टॉल कसे द्यावेत याचे सर्वेक्षण केले होते.त्याचाच आधार घेऊन बेरोजगार सेवा संस्था, महिला सेवा सहकारी संस्थांना स्टॉल लावण्यासाठी महानगरपालिकेच्या वतीने एनओसी देण्यात यावी.व गाळे देण्यात यावेत अशी ही मागणी करण्यात आली.

४) महाराष्ट्र शासनाने दहा लाख रुपये पर्यंतच्या विना निविदा बेरोजगार सेवा सहकारी सहकारी संस्थांना कामे देण्याबाबतचा GR काढलेला आहे, त्या GR चा CR मुंबई महानगरपालिकेने करून घ्यावा अशी ही मागणी करण्यात आली.

यावेळी महापौर रितू तावडे आणि उपायुक्त (घनकचरा व्यवस्थापन) किरण दिघावकर यांनी या बैठकीत झालेल्या विषयांना सकारात्मक प्रतिसाद दिला.

तसेच रोजगार निर्मिती तसेच विविध प्रशासकीय बाबींवर चर्चा करण्यासाठी बेरोजगार सेवा संस्था व फेडरेशन च्या शिष्टमंडळाने दिलेले निवेदन महापौर रितू तावडे यांनी स्वीकारत, बेरोजगार युवकांना रोजगाराच्या अधिकाधिक संधी उपलब्ध व्हाव्यात, तसेच महानगरपालिकेच्या विविध विभागांशी समन्वय साधून ठोस उपाययोजना राबवण्यासाठी लवकरच संयुक्त बैठक आयोजित करण्याबाबत महापौर रितू तावडे यांनी सकारात्मक भूमिका घेतली. मुंबईतील तरुणांना सक्षम बनवणे आणि त्यांना योग्य रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे ही सामूहिक जबागदारी असून या संदर्भात संबंधित विभागांशी समन्वय साधून प्रभावी निर्णय घेण्यासाठी कटिबद्ध असल्याची ग्वाही यावेळी महापौर रितू तावडे यांनी बेरोजगार सेवा सहकारी संस्थांच्या शिष्टमंडळाला दिली.

महापौर यांच्या या बैठकीमध्ये मुंबई शहरातील ७० हून अधिक संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी सहभाग घेतला होता.या शुभेच्छा भेटीचे व बैठकीचे संयोजन मुंबई शहर बेरोजगार सेवा सहकारी संस्था फेडरेशन लि.ने केले. या बैठकीला मुंबई शहर बेरोजगार सेवा सहकारी संस्थांचे फेडरेशनचे अध्यक्ष बाळासाहेब घाडगे, उपाध्यक्ष सुरेश भालेराव, सुनील चव्हाण, स्वप्निल फाटक, संतोष जाधव, अनिशा माजगावकर, हिराचंद्र सूर्यवंशी, संतोष जाधव, अमोल खरात, सतीश सावर्डेकर, हृदयनाथ डोके, अनिल निकम, विजय शेलार, अमोल खरात, संदेश बल्लाळ, संबोधी कांबळे,विजय मोरे, विजय चाळेकर, अनंत भालेकर, बाळासाहेब मुढे व मुंबई शहरातील अनेक संस्थाचे पदाधिकारी या बैठकीला उपस्थित होते.

# खासदार प्रणिती शिंदे यांचा संसद परिसरात गॅस टंचाईवर हल्लाबोल, नरेंद्र ही गायब, सिलेंडर ही गायब

## तात्काळ पुरवठा सुरळीत करण्याची मागणी




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : देशभरात घरगुती गॅस (L.PG) सिलेंडरच्या टंचाईमुळे नागरिकांना मोठ्या अडचणीला सामोरे जावे लागत आहे. गॅस एजन्सी समोर लांबच लांब रागा लागलेल्या दिसून येत असून अनेक ठिकाणी वेळेवर सिलेंडर उपलब्ध होत नसल्यामुळे सामान्य जनतेत तीव्र नाराजी पसरली आहे.

या गंभीर प्रश्नावर आज काँग्रेस अध्यक्ष राज्यसभेतील विरोधी पक्ष-नेते मल्लिकार्जुन खर्गे तसेच सोलापूर लोकसभा मतदारसंघातील खा-सदार प्रणिती शिंदे यांच्यासह इंडिया आघाडीच्या खासदारांनी नवी दिल्लीतील संसद परिसरात जोरदार आंदोलन केले.

यावेळी आंदोलकांनी केंद्र सरकारच्या निष्क्रियतेचा निषेध करत नरेंद्र गायब सिलेंडरही गायक, अशा घोषणांनी परिसर दणाणून सोडला देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे जनतेला त्यांच्या वाऱ्यावर सोडून दिल्याचा आरोप करत वाढत्या महागाई सोबतच आता गॅस टंचाईचे नागरिकांचे जगणे अतिशय कठीण झाल्याचे सांगण्यात आले.

खासदार प्रणिती शिंदे यांनी आंदोलनात सक्रिय सहभाग नोंदवत गॅस सिलेंडरचा पुरवठा तात्काळ सुरळीत करावा अशी मागणी केली व सामान्य कुटुंबांना रोजच्या जगण्यासाठी गॅस हा अत्यावश्यक घटक आहे सरकारने तातडीने हस्तक्षेप करून परिस्थिती नियंत्रणात आणावी असे त्या म्हणाल्या.

काँग्रेसखछ्छ्अख आघाडीने या प्रश्नावर सरकारला जाब विचारला जनतेच्या मूलभूत गरमाकडे दुर्लोच करणाऱ्या सरकारचा जाहीर निषेध केला.

## निफाड येथे रामनवमी निमित्त पिंपळस सायकल राईड



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड सायकलिस्ट आयोजित वसंतोत्सव २०२६ अंतर्गत आयोजित विविध महापुरुष जयंती, पुण्यतिथी निमित्त महिलांसाठी १५ किमी व पुरुषासाठी २१ किमी सायकल राईड करण्याचे उद्दिष्ट देण्यात आले असून त्याअंतर्गत रामनवमी निमित्त निफाड ते पिंपळस राममंदिर येथे भेट देण्यात आली.

निफाड येथील माणकेश्वर चौकातील राममंदिर येथे दर्शन घेतले. याप्रसंगी राईड प्रमुख दिपक बोरसे व विष्णु सुरवाडे यांनी सर्व सायकलीस्ट चे स्वागत केले. राईड दरम्यान झाडे लावा झाडे जगवा, जल ही जिवन है, वृक्ष जगवा जीवन फुलवा, बेटी बचाव बेटी पढाव प्रचार करण्यात आला.

राईड मध्ये उपाध्यक्ष संदीप गवळी, संचालक राजु गवळे, शेखर बागडे, पुजा मगर सायकलिस्ट प्रविण तनपुरे, शिवाजी काकड, विनोद जाधव, योगेश निफाडे, विलास धारराव, अथर्व नकाते, साई गवळी आदींनी सहभाग नोंदवला.

## कळंब येथील उपजिल्हा रुग्णालयात जागतिक क्षय रोग दिन साजरा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधी : कळंब येथील उपजिल्हा रुग्णालयात दि.२४ मार्च २०२६ रोजी जागतिक क्षय रोग दिन साजरा करण्यात आला.

या कार्यकर्माची सुरवात वैद्यकीय अधिक्षक डॉ. नागनाथ धर्माधिकारी व तालुका आरोग्य अधिकारी डॉ सय्यद जे.एन. यांनी रॅली ला हिरवा झेंडा दाखून करण्यात आली. या कार्यक्रमात निक्षय पोषण आहार किट वाटप करण्यात आले. तसेच क्षयरोगा बाबतची शपथ देण्यात आली. या वेळी डॉ. धर्माधिकारी यांनी क्षयरोग कशामुळे होतो या बदल माहिती दिली. तसेच होऊ नये म्हणून काय करावे. झाल्यानंतर काय काळजी घ्यावी. औषध उपचार कसा व कोठे मिळतो. याबाबत सविस्तर माहिती दिली. मा.डॉ. पाटील सर (वैद्यकीय अधिकारी )यांनी क्षयरोग हा मायक्रोबॅक्टियम ट्यूबरक्यूलासेस या जीवाणु मुळे होतो. क्षय रोगाचा शोध १८८२ साली डॉक्टर रॉबर्ट कॉक या शास्त्रज्ञाने लावला, तर टीबीची बीसीजी लस ही डॉ. कॅल्मेट व गेट इन या शास्त्रज्ञाने शोधून काढली. तसेच दोन आठवड्यापेक्षा जास्त काळ खोकला, सायंकाळी येणारा ताप, वजनात घट होणे,भूक मंदावणे या सारखी लक्षणे दिसुन आल्यास तत्काळ नजीकच्या शासकीय दवाखान्या मध्ये थुंकी तपासणी व एक्स-रे तपासणी करण्याचे आवाहन करण्यात आले. तसेच आपल्या शासकीय दवाखान्यामध्ये सिबीनेट व टुण्याट मशीन उपलब्ध असून, रुग्णांनी याचा लाभ घ्यावा. असे आवाहन करण्यात आले. डॉ. दशरथ यांनी क्षयरोगाबाबत मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी डॉ राऊत (वैद्यकीय अधिकारी मोहा ), तालुका आरोग्य अधिकारी कार्यालया मधील कर्मचारी, उपजिल्हा रुग्णालय कळंब येथील कर्मचाऱ्यांनी उप-स्थित राहून कार्यक्रमासाठी परिश्रम घेतले. यासाठी रेणुका नर्सिंग कॉलेज येथील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

## अनाथ मुलांसाठी आनंदाची गुढी..




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : मराठी नवीन वर्षाची सुरुवात अनाथ मुलांच्या चेहऱ्यावर वरती गोड हसू देऊन.... मराठी नववर्षाच्या या गुढीपाडव्याच्या निमित्ताने.... पांडुरंग अण्णा पाटील फाउंडेशनच्या माध्यमातून मुलांना खेळाचे साहित्य व शालेय उपयोगी चार्ट भेट देऊन त्यांच्या मधल्या खेळाडू व अभ्यास वृत्तीला प्रोत्साहन देण्याची एक छोटासा प्रयत्न खेळाचे साहित्य साहित्यामध्ये क्रिकेट बॅट बॉल, हॉलीबॉल, फुटबॉल, बॅडमिंटन. बॅट, शटल स्वीट डिस्का जंपिंग रोप्स दोरीवरची उडी छोट्या मुलांसाठी सॉफ्ट बॉल आणि बास्केटबॉल इत्यादी वस्तू पांढरा अण्णा फाउंडेशनच्या वतीने भेट देण्यात आल्या तसेच गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर अनाथाश्रमात जाऊन अनाथ मुलं व त्यांच्या कुटुंबीयांसोबत गुढी उभारून पूजा करतात आणि ही आपल्या आयुष्यात सुख-समृद्धी आरोग्य आणि हेच घेऊन येऊ अशी प्रार्थना करण्यात आली.

## माजी आमदार दयानंद गायकवाड यांच्या वाढदिवसा निमित्त सत्कार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधी : कळंब तालुक्याचे माजी आमदार दयानंद गायकवाड यांच्या ५६ व्या वाढदिवसा निमित्त मित्रपरिवाराच्या वतीने उत्साहपूर्ण वातावरणात सत्कार करण्यात आला. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर, कार्यकर्ते आणि मित्रपरिवाराने उपस्थित राहून त्यांना शुभेच्छा दिल्या.

या प्रसंगी स्वरमधुर गायक वाहक चौधरी यांच्या हस्ते दयानंद गायकवाड यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. उपस्थितांनी त्यांच्या सामाजिक व राजकीय कार्याचा गौरव करत पुढील वाटचालीस शुभेच्छा व्यक्त केल्या. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे कार्यकर्ते तसेच स्थानिक नागरिकांनीही मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.

यावेळी उपस्थितांनी दयानंद गायकवाड यांच्या जनसंपर्क, नेतृत्वशैली आणि परिसरातील विकासासाठी केलेल्या योगदानाचा विशेष उल्लेख केला.या वेळी सामाजिक कार्यकर्ते यांच्या सह शहरातील समाजबांधव उपस्थित होते.

## रांजणी येथील नॅचरल डेअरी दुष्काळी भागात यशस्वी; दुध उद्योग नेतृत्व करणारा प्रकल्प : बी. बी. ठोंबरे




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

हनुमंत पाटुळे खामसवाडी प्रतिनिधी : कळंब तालुक्यातील रांजणी येथील नॅचरल उद्योग समुहातील नॅचरल डेअरीचा १५ वा वर्धापन दिन व सौर ऊर्जा विस्तारीत प्रकल्पाचा शुभारंभ मा.डॉ. पराग घोगळे, पशुआहार तज्ञ, पुणे यांचे शुभहस्ते व नॅचरल उद्योग समुहाचे संस्थापक अध्यक्ष कृषिरत्न श्री. बी. बी. ठोंबरे यांचे अध्यक्षतेखाली मंगळवार दि. २४ मार्च २०२६ रोजी संपन्न झाला.

या प्रसंगी बोलताना डॉ. पराग घोगळे यांनी सांगितले की, दुध धंदयाकडे व्यवसाय म्हणून पाहावे. दुध व्यवसाय शास्त्रीय पध्दतीने, नियोजनबध्द व मन लावून केला तर १५ ते २०% टक्के दुध उत्पादन वाढते. दुध व्यवसायातीत महत्वाचे खालील तत्वाचा वापर करण्याचा सल्ला त्यांनी यावेळी उपस्थितांना दिला. यामध्ये जनावरांसाठी मुक्त गोठा पध्दतीचा अवलंब करणे, उन्हाळयात जनावरांना पिण्याचे पाणी शुध्द व थंड असले पाहिजे. जनावरांचे योग्य वेळी व नियमीत लसीकरण करणे. जनावरांना ठराविक अंतराने जंताचे औषध दिले पाहिजे. जनावरांच्या आहारांचे नियोजन व वासरांचे योग्य संगोपन या बाबी आवश्यक असल्याचेही त्यांनी आवर्जून सांगितले.

यावेळी बोलताना कृषिरत्न श्री. बी. बी. ठोंबरे म्हणाले की, नॅचरल डेअरीचे माध्यमातून सर्व सामान्य जनतेला आर्थिक स्थैर्य देण्याचे मोठे काम केले आहे. मराठवाडा व त्यातील दुष्काळी भाग म्हणून गणलेला धाराशिव, बीड व लातूर जिल्हा यामध्ये दुध व्यवसाय सुरू करून तो यशस्वी करण्याचे काम नॅचरल डेअरीने केले. अवघ्या दीड एकर जागेत व रू. ५.०० कोटींची गुंतवणूक करून सुरू केलेला डेअरी व्यवसाय आज २३ हजार कुटूंबापर्यत पोहंचला असून या उद्योगाने दुध पुरवठादारांना रू. ९०० कोटी गेल्या १५ वर्षात अदा केले आहेत. दुध पुरवठादारांना दर दहा दिवसाला न चुकता पैसा देणारा एकमेव नॅचरल डेअरीचा दुध व्यवसाय असल्याचेही त्यांनी सांगितले.

उन्हाळा आला की विविध दुध डेअरीच्या कंपन्या आपल्या कार्यक्षेत्रात सुरू होतात आणि हिवाळा किंवा जास्तीचे दुध असले की त्या बंद होतात. त्यामुळे सर्व दुध उत्पादकांनी अशांच्या भूल थापांना बळी न पडता नॅचरल डेअरीलाच आपले दुध देण्याचे आवाहन ही त्यांनी यावेळी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविकामध्ये बोलताना श्रीपाद ठोंबरे, डेअरी समन्वयक यांनी डेअरीचा १५ वर्षातील कामकाजाचा लेखा जोखा सादर केला. तसेच नविन विस्तारीत ३५० केडब्ल्यु सौर ऊर्जा प्रकल्पाची माहितीही विषद केली.

यावेळी उत्कृट कार्य करणारे दुध पुरवठादार, संकलक, वितरक, कर्मचारी व अधिकारी यांना यावेळी सन्मानीत करण्यात आले. डेअरीमध्ये उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल श्री. उकरंडे शिवाजी पोपट, सि. पॅन्ट ऑपरेटर यांना 'नॅचरल डेअरी आदर्श कामगार पुरस्कार (२०२५-२६) देवून सन्मानीत करण्यात आले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचलन कृषीभूषण श्री. पांडूरंग आवाड यांनी केले. तर श्री. अनिल ठोंबरे यांनी उपथितांचे आभार मानले. या कार्यक्रमासाठी कारखान्याचे संचालक, प्रवर्तक, सभासद, दुध उत्पादक, दुध संकलक, दुध वितरक, कर्मचारी मोठया संखेने उपस्थित होते.

### कर्मवीर भाऊराव पाटील स्वायत्त महाविद्यालयात सांस्कृतिक विभागाच्या वतीने सांस्कृतिक महोत्सव स्पर्धा २०२६ च्या उद्घाटन

# कलेशिवाय जीवन अपूर्ण : संध्या साखी





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : मानवी जीवनात कलेला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे, कारण कला ही केवळ मनोरंजनाचे साधन नसून ती मानवी भावविश्वाची अभिव्यक्ती आहे. माणूस विचार, भावना, अनुभव आणि कल्पना व्यक्त करण्यासाठी कलेचा आधार घेतो. चित्रकला, संगीत, नृत्य, नाट्य, साहित्य अशा विविध कलाप्रकारांमधून मानवी जीवनातील आनंद, दुःख, संघर्ष, आशा-निराशा यांचे सूक्ष्म दर्शन घडते. त्यामुळे कला ही मानवी अस्तित्वाशी निगडित असलेली मूलभूत गरज ठरते., असे प्रतिपादन सुप्रसिद्ध भारूडकार सौ. संध्या साखी यांनी केले.

रयत शिक्षण संस्थेच्या येथील कर्मवीर भाऊराव पाटील स्वायत्त महाविद्यालयात सांस्कृतिक विभागाच्या वतीने आयोजित सांस्कृतिक महोत्सव स्पर्धा २०२६ च्या उद्घाटनप्रसंगी त्या प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव हे होते.

सौ. साखी पुढे म्हणाल्या की, तणावमुक्त जीवनासाठी प्रत्येकाने कलेबद्दल प्रेम आणि आदर बाळगणे आवश्यक आहे. वास्तुशिल्प, खेळ, गायन, वादन यांसारख्या कोणत्याही कलेत प्रावीण्य मिळविण्यासाठी सातत्यपूर्ण अभ्यास आणि गुरुंचे मार्गदर्शन आवश्यक आहे. समाजपरिवर्तनासाठी चिकित्सक बुद्धीचा वापर करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. कलेची प्रामाणिक साधना केल्यास युवकांना व्यसनाधीनतेपासून दूर राहता येते, असेही त्यांनी नमूद केले. यावेळी त्यांनी समाजप्रबोधनपर भारूड सादर करून उपस्थितांची दाद मिळवली.

अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव यांनी महाविद्यालय विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी विविध उपक्रम राबवत असल्याचे सांगितले. सर्व विद्यार्थ्यांना विद्यापीठस्तरावर संधी मिळत नसल्याने महाविद्यालयीन स्तरावर अशा स्पर्धांचे आयोजन करणे गरजेचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. सुजाण कलाकार घडविणे आणि त्यांच्यामार्फत समाजप्रबोधन घडविणे हे महाविद्यालयाचे प्रमुख उद्दिष्ट असल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाच्यावेळी मंचावर उपप्राचार्य डॉ. सुशील शिंदे, डॉ. राजेश कवडे, डॉ. भगवान नाईकनवरे, अधिष्ठाता डॉ. बाळासाहेब बळवंत, डॉ. समाधान माने, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. अमर कांबळे आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. मारुती नायकू यांनी केले. त्यामध्ये त्यांनी या सांस्कृतिक महोत्सवात लोकगीते, लोककला, लोकनृत्य, गीतगायन, वाद्यवृंद, शास्त्रीय वादन, नाट्य व एकांकिका सादरीकरण असे एकूण ३४ कलाप्रकार सादर होणार असून महाविद्यालयातील सर्व विभागांच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला असल्याचे नमूद केले.

सूत्रसंचालन प्रा. डॉ. भारती सुडके व प्रा. सारिका भांगे यांनी केले, तर आभार प्रदर्शन सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. रमेश शिंदे यांनी केले.

या कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व विभागांचे विभाग प्रमुख, प्राध्यापक, शिक्षक व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.